अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. १२ जून २०२५ वर्ष १० वे अंक ४४ वा ब्रम्हपुरी पाने ६ किंमत २ रूपये

## लग्नमंडपातून नववधूच्या पर्समधून लाखांच्या भेटवस्तू चोरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरात गुन्हेगारीच्या प्रकरणांत लक्षणीय वाढ होत आहे. अवैध व्यवसाय, घरफोडी, चोरी यासारख्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढले असून, ब्रम्हपुरी पोलिसांनी वेळीच या प्रकरणांवर आळा घालणे आवश्यक आहे. तालुक्यात व शहरात भुरट्या व अट्टल चोरट्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे चोरीच्या घटनांत वाढ झाली आहे. चोरट्यांनी आनंदाचा लक्ष असलेल्या लग्नसमारंभ कार्यक्रमाला सुद्धा गालबोट लागेल असे कृत्य केले आहे. लग्न मंडपातून अज्ञात चोरट्यांनी नववधूची हॅन्डबॅग चोरून २.५ लक्ष रूपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली.

प्राप्त माहितीनुसार, ब्रम्हपुरी येथील राजू कवडूजी कुथे वय ५५ असे फिर्यादीचे नाव आहे. फिर्यादी हे गडचिरोली येथील पोलीस दलातील निवृत्त पोलीस हवालदार आहेत. फिर्यादी राजू कुथे यांच्या मुलीचे लग्न दिनांक ०४/०६/२०२५ नेवजाबाई हितकारणी महाविद्यालय ब्रम्हपुरी येथे आयोजीत करण्यात आले होते. लग्न लागल्यानंतर फिर्यादी कुथे यांच्या साळ भावाची मुलगी कु.करीश्मा मुन्ना प्रधान रा. किन्ही ही करवली म्हणून फिर्यादी कुथे यांच्या मुलीजवळ होती. फिर्यादी कुथे यांनी लग्नामध्ये येणारे पैसे व मोबाईल हे तिच्या जवळ ठेवण्यासाठी दिले होते. दुपारी २.३० वा.चे दरम्यान कु.करीश्मा प्रधान हीचे जवळ ठेवलेले फिर्यादी कुथे यांच्या मुलीची पैसे कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करून नेल्याचे सांगितले. तेव्हा फिर्यादी कुथे यांनी शोध घेतला असता, पर्स व मोबाईल सापडला नाही. अज्ञात चोरट्यांनी चोरी केलेल्या हॅन्डबॅग मध्ये पाहण्याने लग्नात दिलेले लिफाफ्यामध्ये ठेवलेले अंदाजे १.५ लक्ष रुपये व अॅप्पल आयफोन १६ प्रो. २५६ जिबी कंपनीचा मोबाईल कि. १ लक्ष रूपये असा एकूण २.५ लक्ष रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेला.

याबाबत फिर्यादी राजू कुथे यांनी ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. ब्रम्हपुरी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरूद्ध ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ब्रम्हपुरी पोलिस करीत आहेत.

## गोसेखुर्दचे प्रदुषण थांबवा - नाग, कन्हान नद्यांमुळे वाढले प्रदुषण

ब्रम्हपुरी/का.प्र.

नाग नदी, कन्हान नदीमुळे गोसेखुर्द प्रकल्पात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून तातडीने थांबवण्यात यावे आणि प्रकल्पस्तरीय व्यवस्थापन व पर्यावरण समितीची पाच वर्षांपासून न झालेली बैठक घ्यावी, अशी मागणी अशासकीय सदस्य अॅड. गोविंद भेंडारकर यांनी केली आहे.




राज्य सरकारने २५ ऑगस्ट १९९२ रोजी गोसेखुर्द प्रकल्पस्तरीय व्यवस्थापन व पर्यावरण समिती स्थापन केली. मुख्य अभियंता अध्यक्ष असून संचालक, वन, कृषी उपसंचालक, आरोग्य उपसंचालक, भूजल अधीक्षक अभियंता, गोसेखुर्द उपसा प्रकल्प, धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्तांचे शेतकरी प्रतिनिधी सदस्य आहेत. २०२० पर्यंत समितीच्या १८ बैठका झाल्या. यानंतर एकही बैठक झालेली नाही. समिती अध्यक्षांकडे वारंवार विनंती करून देखील दुर्लक्ष करण्यात येत आहे. पाच वर्षांपासून एकही बैठक न घेतल्याने पर्यावरण व्यवस्थापनाकडे कायमची पाठ फिरवली की काय, असा प्रश्न उपस्थित होतो, असेही अॅड. भेंडारकर म्हणाले.

कारखान्यातील दूषित व सांडपाणी नाग नदी, कन्हान नदीद्वारे गोसेखुर्द धरणात मिसळल्याने पाणी दूषित झाले आहे. जलाशयात जलपर्णीका तयार झाल्याने त्याचा परिणाम चंद्रपूर, भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आरोग्यावर झाला आहे. तातडीने पाण्यावर प्रक्रिया करून ही समस्या सोडवावी, अशी मागणीसुध्दा करण्यात आली आहे.

विदर्भ सिंचन महामंडळाने २००६ ते २०१३ या दरम्यान विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी सरळ खरेदीने पाच लाख रुपये हेक्टरप्रमाणे १६ हजार ६३३ हेक्टरसाठी शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याचे मान्य केले. परंतु, अद्याप शेतकऱ्यांना हा मोबदला मिळालेला नाही. ही रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात वळती करावी. या मागण्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास न्यायालयात दाद मागण्यात येईल, असा इशाराही भेंडारकर यांनी दिला.

## टेबलवरील टिव्ही अंगावर पडून दोन वर्षीय बालिकेचा मृत्यू

### सुरबोडी येथील घटना

ब्रम्हपुरी/का.प्र.

एका दोन वर्षीय मुलीच्या अंगावर टिव्ही पडल्याने तिचा मृत्यू झाल्याची घटना दि. ९ जुनला रात्री ८ वाजताच्या सुमारास तालुक्यातील सुरबोडी येथे घडली. रिध्दी सचिन सहारे असे मृतक चिमुकलीचे नाव आहे. सुरबोडी येथील सचिन शहारे हे कुटूंबियांसोबत जेवन करीत असताना शेजारीस त्यांची एक पाच वर्षाची व मुलगी व दुसरी दोन वर्षाची रिध्दी या दोन्ही मुली खेळत दरम्यान जवळच होत्या. नादुरूस्त



मृतक बालिका रिध्दी सहारे

असलेली टिव्ही एका टेबलवर ठेवून असताना रिध्दीचा धक्का त्या टेबलला लागला. यातच टिव्ही रिध्दीच्या डोक्यावर पडल्याने ती गंभीर जखमी झाली. यात तिच्या डोक्याला गंभीर दुखापत होवून रक्तस्त्राव झाला. यामुळे तिला खिस्तानंद हॉस्पिटल ब्रम्हपुरी येथे दाखल करण्यासाठी नेले असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.



संपादकीय...

# लग्नपध्दतींचा नव्याने विचार हवा

आधुनिक युग आले, सुबत्ता आली, सगळयांना शिक्षण मिळाले की हळूहळू लोक सुधारतील आणि अन्याय प्रवृत्ती कमी होईल, अशी आपली भाबडी समजूत होती. एक वर्ग राजकीय सुधारणांबरोबरच सामाजिक सुधारणा घडण्याची मोठी आशा बाळगून होता. प्रत्यक्षात मात्र हुंडाविरोधी कायद्यानंतरही खेड्यापाड्यातील एखाद्या घराबरोबरच आधुनिकतेचे वारे लागलेल्या मोठ्या शहरांमध्येही अत्यंत क्रूरपणे अशा घटना घडताना दिसतात, तेव्हा हताश व्हायला होते. आतापर्यंतच्या सुधारणांनी नेमके काय साधले, हा प्रश्न उभा राहतो आणि माणसे बदलतच नसतील तर पुन्हा कुठून सुरूवात करायची हा प्रश्न समोर उभा राहतो. सध्या लग्न हा घरगुती समारंभ राहिला नसून त्याचेही आधुनिकीकरण आणि राजकीयकरण झाल्याचे बघायला मिळते. अजूनही लग्नपरंपरेतील स्त्री शोषणाचा भाग पूर्णपणे संपलेला नाही. आज जुन्या परंपरांचे वैभवीकरण केले जाते, खेरीज त्यामागील बटबटीतपणा आणि जळजळीत वास्तवही अशा काही उदाहरणांवरुन समोर येते तेव्हा फोलपणा ठळकपणे जाणवतो. या सगळयामागे पैसा ओरबडण्याची प्रवृत्ती आणि पुरुषप्रधान मानसिकताच दिसते. ती समाजाच्या सर्व स्तरांमध्ये पहायला मिळते. त्यामुळेच सदर प्रश्नाचे उत्तर शोधायचे तर आपल्याला आधी या मानसिकतेवर काम करावे लागेल.

आज पुन्हा एकदा लग्न किती मोठ्या प्रमाणात केले जाते, भेटी कशा दिल्या जातात, डामडौल आणि हौसमौज किती केली जाते याला प्रतिष्ठा मिळत आहे. मधल्या काळात समाजसुधारकांनी केलेल्या कामामुळे मागे पडलेले हे मुद्दे आता नव्याने समोर येत आहेत. समाजात अतिरिक्त संपत्ती निर्माण झाली आणि त्यानंतर समारंभाचे राजकीयकरण सुरू झाले. शेवटी अतिरिक्त संपत्ती शोषणातून निर्माण होते, हा सर्वमान्य सिद्धांत आहे. बदलता समाज या सिद्धांताप्रमाणे निर्माण झाला आणि तसेच वागू लागला. गावोगावी गुंठापाटील वाढले तर सरकारी वा खासगी नोकरीत मिळणाऱ्या मोठ्या पॅकेजमुळे, जागतिकीकरणानंतर झालेल्या व्यापारवृद्धीमुळे सामान्यांच्या हातात मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त पैसा खेळू लागला. हाच पैसा पुढे प्रतिष्ठेशी जोडला गेला. पूर्वी बक्कळ पैसा बाळगून असणारी माणसेही साधी राहायची. साधेपणाने जगायची. पैशाचे प्रदर्शन करणे हिणकस असल्याची, हे पाप असल्याची जाणीव तेव्हा सगळयांना होती. मात्र जागतिकीकरणाच्या सगळया कोलाहलात स्वतःला एकटे समजणाऱ्या माणसाने आपली ओळख निर्माण करण्याचा मार्ग, मी कोणी तरी वेगळा आहे हे दाखवण्याचा उपाय शोधण्यासाठी पैशाचे प्रदर्शन मोठ्या प्रमाणात सुरू केले. जो तो शक्य त्या सगळया संसाधनांचा वापर करुन आपले अस्तित्व ठळकपणे मिरवू लागला. कदाचित विवाहसोहळयाला आलेले अपरंपार महत्त्व आणि त्या निमित्ताने होणारे पैशाचे प्रदर्शन ही बाब या प्रकारांना कारणीभूत ठरली असेल.

पूर्वी राजकारणी वा समाजातील प्रतिष्ठित लग्नसोहळयामध्ये लक्षभोजन घालताना दिसले तर सामाजिक कार्यकर्ते निदर्शन करताना दिसायचे. वृत्तपत्रे आपल्या बातम्यांमधून या प्रवृत्तीचा निषेध करताना दिसायची. मात्र कालांतराने हा वर्ग गप्प झाला आणि आपला नेताच लग्नामध्ये हजारोंची गर्दी जमवत असेल तर आपणही बरेच लोक गोळा करायला हवेत, असे समजून त्यांचे कार्यकर्तेही घरातल्या लग्नसोहळयासाठी संपूर्ण गावाला आमंत्रण देऊ लागले. हा शक्तीप्रदर्शनाचा एक भाग झाला. केवळ लग्नालाच नव्हे तर अंत्ययात्रा वा अगदी दहाव्याच्या कार्यक्रमालाही गर्दी जमवली जाऊ लागली. यातूनच माणसाचे मूल्यमापन तो माणूस म्हणून कसा आहे यावरुन न होता, त्याने गर्दी किती जमवली यावरुन होऊ लागले. एखाद्याच्या मागे किती लोक आहेत, हा प्रतिष्ठेचा मुद्दा ठरु लागला. अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत महाराष्ट्रात वाढदिवस, विवाहाचे वाढदिवस वा यासारखे सोहळे घरगुती स्वरुपाचे असत. मात्र आता लग्नाच्या वाढदिवसालाही मोठे कार्यालय घेण्याचा प्रघात बघायला मिळतो. प्रत्येक छोट्या-मोठ्या गोष्टीसाठी शुभेच्छा आणि भेटवस्तूंचा पाऊस पडतो. अशा प्रकारे हातातला पैसा कोणत्या ना कोणत्या इव्हेंटमध्ये खर्च करण्याची नवी मानसिकता बघायला मिळत आहे. हे सगळे मुद्दे बदलत्या सामाजिक समस्यांच्या मुळाशी आहेत असे म्हणावे लागेल. पूर्वी राजकारण हा ठराविक गटापुरता मर्यादित विषय होता. मात्र आज राजकारण वेगवेगळया स्वरुपात सर्वत्र पसरत आहे. आज प्रत्येक राजकारणी जास्तीत जास्त लोकांमध्ये मिसळण्याची संधी शोधतो. आज पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री अशी सर्व राजकीय मंडळी बिनदिक्कत धनदांडग्यांच्या विवाहसोहळयांना हजेरी लावताना दिसतात. हे चित्र बदलण्याची गरज आहे.

दुसऱ्या बाजुने पाहता आज लग्नात हुंडा मागितला गेला असेल का, सासरचे लोक मुलीचा नीट सांभाळ करतील का, लग्नात खर्च होणारा पैसा कोठून आला असेल यासारखे प्रश्न कोणाच्या खिजगणतीतही नसतात. हगवणे कुटुंबीयांसारखे हैवान मिळाले तरी मुली वा तिच्या माहेरची मंडळी दबावाखाली येऊन न्यायालयाचे दार ठोठावण्यास घाबरतात. यातूनच शक्य तेवढ्या मागण्या पूर्ण केल्या जातात आणि अगदीच नाईलाज झाला की जीवन संपवण्याचा विचार करुन मुली आपली सुटका करुन घेतात. वरच्या वर्गातील साजरीकरणाच्या सर्व पद्धती हळूहळू खालच्या वर्गापर्यंत पाझरत जातात. आज हे वास्तवही अगदी ठळकपणे बघायला मिळते. साखरपुडा, हळद समारंभ, रिसेप्शन यासारखे प्रकार ग्रामीण भागातही मोठ्या धामधुमीत पार पडतात. थोडक्यात, आज ग्रामीण भागातील वधू-वर आपले रोल मॉडेल शहरी भागामध्ये शोधतात आणि त्याचेच अनुकरण करतात. आर्थिक ताण आणि आर्थिक अपेक्षा वाढण्यामागे हा भागही महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागामध्ये नवरीला मंडपात आणण्यासाठी हेलिकॉप्टरचा वापर केला जातो, तेव्हा समाज किती आणि कशा प्रकारे बदलत आहे हे समजते. हे सगळे प्रकार समाजाला चुकीच्या दिशेकडे नेणारे आहेत. यातूनच पैशाचा हव्यास वाढतो. पैशासाठी, चैनीसाठी मुलींचा छळ करण्याची मानसिकता फोफावते. दिखाऊपणा बोकाळतो आणि वैष्णवीसारख्या अनेक भाबड्या कळया हकनाक भरडल्या जातात. म्हणूनच आता तरी हे सगळे थांबवणे गरजेचे आहे. त्यासाठी अगदी शालेय पातळीपासून प्रयत्न करावे लागतील. स्त्री कडे पाहण्याची मुलांची मानसिकता बदलावी लागेल. हे काम पुन्हा एकदा नेटाने हाती घ्यावे लागेल. त्यात अवघ्या समाजाला उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे लागेल. त्याला काहीही पर्याय नाही.

# शेतकऱ्यांना लवकर मिळणार बोनस व धानाची रक्कम

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी विधानसभा माजी आमदार प्रा.अतुलभाऊ देशकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री नाम. देवेंद्रजी फडणवीस यांची वर्षा बंगल्यावर थेट भेट घेऊन ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्राचे विकासासंबंधी चर्चा करून आवश्यक निधीची पूर्तता करावी अशी मागणी केली. तद्वतच डिसेंबर ते मार्चपर्यंत मार्केटिंग फेडरेशनने खरेदी केलेल्या धानाचा बोनस अजून पर्यंत शेतकऱ्यांना प्राप्त झाला नाही तसेच काही शेतकऱ्यांच्या धानाचे पेमेंट देखील झाले नाहीत. ही बाब अतुल भाऊंनी मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली.

आता शेतीच्या हंगामाला सुरुवात झालेली आहे आणि शेतकरी बांधव बोनस आणि ज्या शेतकऱ्यांचे पेमेंट झाले नाहीत ते प्रतीक्षेत आहेत. आता ही प्रतीक्षा दूर करावी अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे. वास्तविक शेतकऱ्यांना बोनस देण्याचे फडणवीस सरकारने मंत्रिमंडळात निर्णय घेतलेला आहेच हे सरकार शेतकऱ्यांप्रती संवेदनशील आहे हे फडणवीस सरकारने दाखवून दिले आहे. अतुलभाऊंची शेतकऱ्यांप्रती असलेली तळमळ बघून मुख्यमंत्र्यांनी अतुलभाऊंना आश्वस्त करून लगेच संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. बोनस वाटपाची आणि धान विक्री करणाऱ्या उर्वरित शेतकऱ्यांचे पेमेंट अदा करण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करावी अशा सूचना केल्या. बोनस आता लवकरच मिळणार आणि तसेच उर्वरित धान उत्पादकांचे रखडलेले पेमेंट देखील मिळणार या आशेने शेतकरी सुखावला असून याबद्दल अतुलभाऊंचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# एनसीसी गर्ल्स युनिटतर्फे वृक्षारोपण व प्रबोधन कार्यक्रम



ब्रम्हपुरी/का.प्र.

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने ने.ही. महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथील एन.सी.सी. गर्ल्स युनिट (३ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन, नागपूर) च्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर उपक्रमात एन.सी.सी. कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाअंतर्गत कॅडेट्सनी बोंडेगाव तलाव परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

या उपक्रमात 'परिपत्र अर्थव्यवस्था व हरित हायड्रोजनची वाढती गरज' या अत्यंत समकालीन व महत्वाच्या विषयावर डॉ. हर्षा मुंगोले, सहा. प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग, शांताबाई भैय्या महिला महाविद्यालय, ब्रम्हपुरी यांनी प्रेरणादायी व्याख्यान दिले. त्यांनी सध्याच्या काळात पर्यावरणपूरक तंत्रज्ञान, हरित ऊर्जा व चक्राकार अर्थव्यवस्थेची आवश्यकता यावर सखोल विवेचन केले.

कार्यक्रमास कॅप्टन डॉ. कुलजीत कौर गिल यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कॅडेट्समध्ये देशभक्तीबरोबरच पर्यावरणाबाबत जागरुकता निर्माण झाली. सदर उपक्रम कार्यकारी प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन एन.सी.सी. अधिकारी कॅप्टन डॉ. कुलजीत कौर गिल व सहयोगी प्राध्यापकवृंदाने केले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामुळे महाविद्यालयाच्या वतीने पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या योगदानाचे सर्वत्र कौतुक होत आहे. एन.सी.सी. कॅडेट्सनी दाखवलेली उत्स्फूर्ती आणि सामाजिक बांधिलकी निश्चितच अनुकरणीय आहे.

**जल है तो कल है...**

# आमदार बंटी भांगडिया यांच्या मदतीतून नागभीड शहराकरीता शव फ्रिजर उपलब्ध



नागभीड/प्रतिनिधी

चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडिया यांच्या सहकार्याने नागभीड शहरात शव फ्रिजर उपलब्ध झाले. सदर फ्रिजरची मागणी स्थानिक भाजपा पदाधिकाऱ्यांनी केल्यावर आवश्यकता बघता आमदार साहेबांनी त्वरित मागणी पूर्ण करीत शव फ्रिजर उपलब्ध करून दिले. सदर फ्रिजरचे उद्घाटन आमदार बंटीभाऊ भांगडिया यांच्या नेतृत्वात, गणेशभाऊ तर्वेकर यांच्या हस्ते भाजपा कार्यालयात पार पडले.

यावेळी माजी बांधकाम सभापती सचिनभाऊ आकुलवार, धनराज काटेखाये, अजय काबरा, रमेश ठाकरे, संजय मालोदे, डॉ.पवन नागरे, गुड्डू भोयर सह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सदर फ्रिजर भाजपा कार्यालय नागभीड येथे जनतेच्या सेवेसाठी उपलब्ध राहणार आहे .

## विनोदिनी

वयाची सत्तरी पूर्ण केलेली एक आजी दर वर्षी गावात आपल्याच नवऱ्याशी संपूर्ण विधिनुसार लग्न करायची. त्यांच्या या दरवर्षी होणाऱ्या लग्नाचा विषय कुतुहलाचा ठरला होता. एके दिवशी न राहवून एका माणसाने त्या स्त्रीला गाठून विचारलंच..

माणूस : हे काय दर वर्षी तुम्ही तुमच्याच पतीशी विधिवत लग्न करता! तुमच डोकं ठिकाणावर आहे ना?

आजी : मी फक्त दोन शब्द ऐकण्यासाठी हे सगळं करते.....

माणूस :- कोणते...?

आजी : मुलीला बोलवा........!

# 'मी शंभर वर्षांचा होतो... तरीही मला तोडलं'

## ब्रम्हपुरीतील ऐतिहासिक वृक्षावर रस्त्याच्या कामासाठी कोसळली कुऱ्हाड

ब्रम्हपुरी/का.प्र.

'मी आहे ब्रह्मपुरीतील एक वृक्ष. माझं वय सुमारे शंभर वर्षं... पण शेवटी मी विकासाच्या कुऱ्हाडीखाली कोसळलो. माझ्या सावलीत जे पिढ्यानपिढ्या विसावले, त्यांनीच मला विसरून टाकलं...' अशी ही एका वृक्षाची दु:खद आत्मकथा आज ब्रह्मपुरीतील अनेकांच्या मनात घर करून गेली आहे.

तालुक्यातील मुख्य मार्गावरील एक प्राचीन वृक्ष नुकताच रस्त्याच्या रुंदीकरणासाठी तोडण्यात आला. हा वृक्ष फक्त एक निसर्ग घटक नव्हता, तर तो संपूर्ण परिसराचा सांस्कृतिक व सामाजिक इतिहास जपत उभा होता. काळाच्या अनेक टप्प्यांना साक्ष देत उभं होतं. त्याच्या सावलीत शाळकरी विद्यार्थी, प्रवासी विसावा घेत होते. हे झाड केवळ पर्यावरणाची सजावट नव्हती, तर शहरातील आठवणींचा एक आधारस्तंभ होता. ब्रह्मपुरी शहरात रस्त्याच्या रुंदीकरणाचं काम सध्या प्रगतीपथावर आहे. प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित झाड रस्त्याच्या मधोमध येत असल्यामुळे त्याला तोडण्यात आले. 'पर्यावरणास हानी



पोहोचविण्याचा आमचा उद्देश नाही. झाडे वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला गेला,' असं प्रशासनाचं म्हणणं आहे. पण स्थानिक नागरिक आणि पर्यावरण प्रेमींच्या मते, 'विकासाच्या नावाखाली झाडं तोडणं म्हणजे भविष्यातील जीवन संपवण्यासारखं आहे,' तसंच, झाडाच्या जागी नव्या वृक्षारोपणाचं आश्वासन अद्यापही अमलात आलेलं नाही.

विकासाबरोबर निसर्गाचा समतोल राखणं ही प्रत्येक प्रशासनाची आणि नागरिकांची सामूहिक जबाबदारी आहे. एक झाड, ज्याने शंभर वर्षं शहराच्या सुख-दुःखाचा भाग बनून आयुष्य दिलं. त्याच्या शेवटी आपल्याला थांबून विचार करावाच लागेल. आपण फक्त रस्ते बनवत आहोत की माणूसपण विसरत चाललो आहोत? पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडे लावणे ही काळाची गरज आहे. एक झाड केवळ सावली देत नाही तर प्रदूषण रोखणे, पाणीधारणा, पक्ष्यांचे निवासस्थान अशा अनेक नैसर्गिक चक्रांचा आधारस्तंभ असते. 'विकासाच्या नावाखाली झाडं तोडली जात असतील, तर तितकीच झाडं नव्याने लावणं आणि जपणं ही समाजाची आणि प्रशासनाची समान जबाबदारी आहे.

# जि.प. शाळा मेंडकीच्या शिरपेचात मानाचा तुरा

## शाळेतील तीन विद्यार्थी सैनिकी स्कुल परिक्षेच्या पात्रता परिक्षेत उत्तीर्ण

ब्रम्हपुरी/का.प्र.

पंचायत समिती ब्रम्हपुरी अंतर्गत मेंडकी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेचे तीन विद्यार्थी सैनिकी स्कूलच्या परीक्षेत क्वालिफाय झालेले असून शाळेचे व गावाचे नाव उज्वल केले आहे. या विद्यार्थ्यांनी कठोर अभ्यास, मार्गदर्शन व सातत्यपूर्ण प्रयत्नामुळे हे यश संपादन केलेले आहे.

त्यांच्या या यशामागे पालकांचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मार्गदर्शन व विद्यार्थांची मेहनत आहे. देवर्ष फाल्गुन आंबोरकर,



सान्वी सुनील दुधे, देव्या गुरुदेव वाघुळकर अशी तिघांची नावे आहेत. शाळेचे मुख्याध्यापक हरिदास तलमले सर यांनी सांगितले, 'ही केवळ शाळेचीच नव्हे तर संपूर्ण परिसराची अभिमानास्पद बाब आहे. यामुळे इतरांना प्रेरणा मिळेल'.

विद्यार्थ्यांना कु. नलिना शहारे मॅडम यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. सुट्टीच्या दिवशी शाळेत जाऊन ज्यादा वर्ग घेतले. त्यांचे या यशात मोलाचे योगदान आहे. शाळेतील इतरही सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. हा निकाल शाळेसाठी ऐतिहासिक असून यापुढील काळात विद्यार्थ्यांना आणखी अशा संधी मिळाव्या यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

# प्रा. प्रकाश बगमारे यांची रूग्णसेवा

ब्रह्मपुरी/का.प्र.

शहरातील अत्यंत वर्दळीच्या ख्रिस्तानंद हॉस्पिटल जवळच्या प्रियदर्शनी इंदिरा गांधी चौकात दोन दिवसापासून एक अनोळखी वृद्ध पुरुष आजाराने फणफणत होता. त्याकडे येणारे जाणारे पहात होते. त्याला लवकर वैद्यकीय सुविधा मिळाली नाही तर त्या व्यक्तीचा प्राण जाण्याची शक्यता होती. भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव प्रा. प्रकाश बगमारे हे काही कार्यकर्त्यांसह त्या चौकात गेले असता त्यांना हे दृश्य दिसले.



त्यांनी तात्काळ ग्रामीण रुग्णालयाच्या ॲम्बुलन्सला बोलावून तसेच डॉ. राहुल मेश्राम व त्यांच्या पत्नी यांच्या माध्यमातून प्राथमिक उपचार करून नंतर ग्रामीण रुग्णालय ब्रह्मपुरी येथे त्याला रवाना केले. याप्रसंगी गुजराती भोजनालय चे उमेश पटेल, जिभकाटे, जयघोष सहारे, मिलिंद राऊत आणि रमेश रिक्षावाला यांनी विशेष सहकार्य केले.

प्रा. प्रकाश बगमारे यांच्या समय सूचकता व रुग्णांची सेवा करण्याचा सेवाभाव यामुळे त्या अनोळखी इसमाला वैद्यकीय सेवा उपलब्ध झाली .त्यांच्या या कृतीबद्दल सर्वत्र प्रा. प्रकाश बगमारे यांचे कौतुक होत आहे.

# डॉ. आंबेडकर महाविद्यालयात पर्यावरण दिन साजरा




ब्रम्हपुरी/का.प्र.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ब्रह्मपुरी येथे एनसीसी गर्ल्स युनिट यांच्यावतीने वृक्षारोपण करून पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

३ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन चे कमांडींग ऑफिसर कर्नल राजीव भोला आणि ए. ओ. मेजर ममता शंकर यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेश कांबळे यांच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयात पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. पर्यावरण दिनानिमित्त एनसीसी गर्ल्स युनिट च्या वतीने परिसरात वृक्षारोपण करण्यात आले व ३ महाराष्ट्र गर्ल्स युनिटच्या वतीने पर्यावरणाचे संवर्धन या विषयावर पोस्टर्स स्पर्धा घेण्यात आली तसेच 'पर्यावरण रक्षण ही काळाची गरज आहे', 'झाडे लावा झाडे जगवा' हे स्लोगन देत जनजागृती करिता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाची औचित्य साधून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.देवेश कांबळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पर्यावरणासंबंधी चे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास महाविद्यालय प्राध्यापक वृंद विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच ३महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी युनिट चे २९कॅडेटस उपस्थित होते. सदर कार्यक्रम लेफ्टनंट प्रा. सरोज शिंगाडे यांच्या मार्गदर्शनात पार पडला.

नियमित वाचा...
अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे
वार्षिक वर्गणीदार व्हा...
: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर,
विद्यानगर, ब्रम्हपुरी
: जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३९००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७९५३९५

# जागतिक पातळीवर लोककलांच्या वाट्याला दुर्दैवी वास्तव येतं - प्रा. द्वादशीवार

## डॉ. धनराज खानोरकर यांच्या 'संजोरी' ग्रंथाचे प्रकाशन



चंद्रपूर/प्रतिनिधी

'रशियातील लोकनृत्य पाहायला रशियन नसतात, बाहेरचे पर्यटक असतात. मी नंदुरबार पासून देश, विदेशातील गडचिरोलीच्या सिरोंच्यापर्यंतचे आदिवासी पाहिले. ते गरिब, दरिद्री, कष्टकरी आहेत पण ते दु:खी, खिन्न, निराश नाहित. त्यांच्या पोरांच्या तोंडावर माशा बसतात पण ते हसतात. चांगले लेख प्रा. खानोरकरांनी 'संजोरी'त लिहलेत अन् ते खास विनोदी शैलीत. 'संजोरी' म्हणजे धान चुरन्याचे खळयावरील शेवटच्या मोळयाचे मटनाचे जेवन. या देशातले ८४ टक्के हिंदू मांसाहारी आहेत. 'संजोरी' याही दृष्टीने महत्त्वाची आहे. जे इतिहास विसरतात त्याला भविष्य असत नाही. ग्रामीण, आदिवासी, झाडीपट्टीचे सौंदर्य 'संजोरी'त आहे. येथील झाडी माणसाची मोहमाया हा अत्यंत सुंदर लेख. कधीतरी संचिताकडे आपण लक्ष दिले पाहिजे, ते यांनी दिले. तिखट ही चव आहे. हिरोती हा त्याचा खरा शब्द आहे. संवाद हे साध्य आहे, भाषा माध्यम आहे, म्हणून संवाद व्हावा. 'संजोरी' पुस्तकात राहू नये ती लोकांच्या मनात जावी. आपण या लोककलांपासून दूर चाललो आहोत म्हणून जागतिक पातळीवर लोककलांच्या वाटयाला दुर्दैव येतं.' असे बहूमूल्य विवेचन ज्येष्ठ संपादक व प्रसिद्ध कादंबरीकार प्रा.सुरेश द्वादशीवारांनी केले.

ते डॉ.धनराज खानोरकर लिखित झाडी लोककला, लोकसंस्कृतीच्या 'संजोरी' ग्रंथ प्रकाशनानिमित्त श्रमिक पत्रकार संघ भवनात बोलत होते. 'संजोरी'चे प्रकाशन त्यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रम चंद्रपूर जिल्हा झाडी बोली साहित्य मंडळाने आयोजित केला होता. विचारपिठावर भाष्यकार म्हणून नागपूरचे प्रसिद्ध लेखक व समीक्षक डॉ.प्रमोद मुनघाटे, डॉ.श्याम मोहरकर, ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर व लेखक डॉ.धनराज खानोरकर, कवी अरुण झगडकर उपस्थित होते. यावेळी डॉ.मुनघाटे म्हणाले, 'संजोरी' हा प्राध्यापकांचा संशोधन पेपर नव्हे ते झाडीचे सांस्कृतिक संचित आहे. हे त्यांनी एक पुस्तकरुपाने दस्तऐवज म्हणून आपल्या सामोर आणलं आहे. झाडीच्या लोककलांबद्दलचा असा पुस्तक पहिल्यांदाच आला. ते यमक, श्लेष वापरतात व स्वत:च नव्या म्हणींना जन्म देतात. हे प्रा.खानोरकरांचे काम बहुमूल्य असे आहे.' तर डॉ.मोहरकरांनी, डॉ खानोरकरांनी स्वत:ची खास शैली घडवली असून बोलणं, लिहिणं, वागणं एका तालात आहे. 'संजोरी' वाचतांना याची पानोपानी प्रचिती येते, असे विचार मांडले.

प्रास्ताविकातून ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकरांनी झाडीबोलीचा इतिहास कथन केला. डॉ.खानोरकरांनी 'संजोरी' जन्माची कथा सांगितली. संचालन कवी अरुण झगडकर यांनी तर आभार प्रदर्शन कवी प्रशांत भंडारेंनी केले. कार्यक्रमाला अनेक कवी, लेखक, विचारवंत व श्रोते उपस्थित होते.

# शासनाने मंजूर केलेल्या जमिनीचा प्रमाणपत्रानुसार ताबा द्या

## बिगर सातबारा संघटनेच्या सदस्या कुंदना काथले यांची मागणी

नागभिड/प्रतिनिधी

दलीत, आदिवासी, भूमिहीन, बेघर, ओबीसी, गरीब मराठा तथा सातबारा नावावर नसलेल्या लोकांच्या न्याय हक्कासाठी सांविधनातमक मार्गाने संघर्ष करणारी आशिया खंडातील पहिली क्रांतिकारी संघटना बिगर सातबारा शेतकरी संघटना आणि त्या संघटनेचे प्रनेते भाई जगदिश कुमार इंगळे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात कुंदना काथले यांनी जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर यांच्याकडे निवेदन दिले.



नागभीड तालुक्यातील कानपा येथील आदिवासीं गोंड समाजाला शासनाकडून मिळालेल्या जमिनीचा प्रमाण पत्रानुसार कब्जा मिळण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६नुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार मंडळ निरीक्षक कर्तव्य आणि कामे नियम १९७० मधील नियम १७ प्रमाणे ग्राम महसूल अधिकारी यांच्या मार्फत जमीनीचा पंचनामा स्थळ निरीक्षण प्रत्यक्ष मोका पाहणी करून शासनाकडून मिळालेल्या प्रमाण पत्रानुसार मंजूर झालेल्या क्षेत्राची शहानिशा करून रेवणी केस नंबर ११५/१९७२-७३ ग्राम कनपा ता. ब्रह्मपुरी नायब तहसीलदार यांनी वितरित केलेलें प्रमाणपत्र नुसार रोहिदास घोडम यांच्या वारस कुंदना काथले शेसराव मडावी, मनोज मडावी शांताबाई उईके, कमला कुळमेथे घडीराम कुलमेथे अमिता घोडाम धनसिंग उईके रामसिंग उईके यांना जमिनीचे प्रमाण पत्र वितरित झाले परंतु प्रत्यक्ष ताबा मिळाला नाही म्हणून बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे प्रणेते भाई जगदीश कुमार इंगळे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात निवेदन सादर करण्यात आले. यावेळी क्रांतिवीर बाबुराव शेडमाके आदिवासीं गोंड समाज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माणिकराव शेडमाके उपस्थित होते.

❀❀❀❀❀❀

# रेनकोटचे वाटप करून राजू भागवत यांचा वाढदिवस साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

प्रत्येकाच्या जीवनात एक दिवस वाढदिवसाचा क्षण येत असतो. परंतु आता वाढदिवस मग तो मुलामुलींचा असो , पत्नीचा असो वा स्वत: चा असो तो धुमधडाक्यात साजरा करण्याचा पायंडाच पडलेला आहे. प्रत्येक व्यक्ती त्यांचा वाढदिवस हा वेगवेगळया पध्दतीने साजरा करीत असतात.

सामाजिक कार्यकर्ते राजू भागवत सर हे मात्र दरवर्षी ते त्यांचा वाढदिवस सामाजिक समरसते च्या भावनेने साजरा करतात. ते कधी वृक्षारोपण करतात, कधी दवाखान्यात जाऊन रुग्णांना फळे वाटप करतात तर कधी मराठी शाळेत जाऊन मुलांना बुक , पेन्सिल चे वाटप करतात.

यावर्षी मात्र त्यांनी पावसाळा लक्षात घेता गावातील काही चर्मकार बंधूंना रेनकोट चे वाटप केले हा त्यांचा एक स्तुत्य कार्यक्रम आहे. इतरांनीही त्यांच्या या उपक्रमापासून प्रेरणा घेऊन गरजूंना मदत करावी.

# भाजपच्या 'संकल्प ते सिध्दी' अभियानाबाबत आढावा बैठक

ब्रह्मपुरी/का.प्र.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारची सेवा, सुशासन, गरीब कल्याण्याची ११ वर्ष पूर्ण झाले. मागील ११ वर्षात देशाचा चेहरामोहरा बदलला आहे. देशासाठी पंतप्रधान मोदीजींनी केलेले संकल्प जलदगतीने पूर्ण होत आहेत. या निमित्ताने भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून 'संकल्प से सिद्धी' अभियान राबविण्यात येत आहे. ब्रह्मपुरी विधानसभेतील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा सिंदेवाही येथील श्रीकृष्ण मंदिराच्या सभागृहात भाजपा नेते तथा माजी आमदार प्रा. अतुलभाऊ देशकर यांच्या अध्यक्षतेखाली व चंद्रपूर जिल्ह्याचे भाजपाचे अध्यक्ष हरीशजी शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

या कार्यशाळेला संबोधित करतांना ब्रह्मपुरी विधानसभेचे माजी आमदार प्रा. अतुलभाऊ देशकर यांनी मोदी सरकारच्या ११ वर्षातील लोकाभिमुख निर्णय, काम व योजना जनतेत जाऊन सांगण्याचे आवाहन पदाधिकाऱ्यांना केले. सोबतच 'संकल्प से सिद्धी' या अभियानाच्या माध्यमातून विधानसभेतील सर्व कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन उपस्थितांना केले. तर भाजपा जिल्हाध्यक्ष श्री. हरीशजी शर्मा यांनी सामोहिकता, सहजता, अनामिकता या धोरणाने पक्षाचे काम करावे असे प्रतिपादन केले. या प्रसंगी भाजपा ब्रह्मपुरी विधानसभेच्या वतीने श्री. हरीशजी शर्मा यांची भाजपा चंद्रपूर जिल्ह्याच्या अध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन व सत्कार करण्यात आला. भाजपा जेष्ठ नेते प्रा. गणवीर व ब्रह्मपुरी तालुका महामंत्री श्री. मनोज वठे यांनी याप्रसंगी कार्यकर्त्यांच्या वतीने शुभेच्छा व्यक्त केल्या.

कार्यशाळेचे प्रास्ताविक विधानसभा विस्तारक प्रा. कादर शेख यांनी केले व संचलन युवा मोर्चाचे देवा मंडलवार यांनी केले. कार्यशाळेला भाजपा जिल्हा महामंत्री संध्याताई गुरनुले, डॉ. मंगेश गुलवाडे, विवेक बोढे, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश पदाधिकारी प्रा. प्रकाश बगमारे, वंदना शेंडे, अरुण शेंडे, अर्जुन भोयर यांच्या सह विधानसभेतून शक्तीकेंद्र प्रमुख, तालुका-जिल्हा पदाधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# शैक्षणिक दाखले, शपथपत्रासाठी मुद्रांकाची गरज नाही

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची अधिकाऱ्यांना तंबी

ब्रम्हपुरी/का.प्र.

शासनाच्या कार्यालयातील ई-सेवा केंद्रातून विविध शैक्षणिक दाखले तसेच न्यायालयातील प्रतिज्ञापत्रासाठी शंभर व पाचशे रुपयांच्या मुद्रांक पेपरची करण्यात येणारी मागणी नियमबाह्य आहे. यापुढे अशी मागणी करण्यात येऊ नये, अशी तंबी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल अधिकाऱ्यांना दिली आहे.

नवीन शैक्षणिक वर्ष लवकरच सुरू होत असून त्यासाठी शैक्षणिक दाखल्यांसाठी विद्यार्थी पालकांची ई- सेवा केंद्रात गर्दी होत आहे. मात्र ही कागदपत्रे तसेच न्यायालयातील प्रतिज्ञापत्रासाठी ई-केंद्र चालक १०० व ५०० रुपयांच्या मुद्रांक पेपरची मागणी करून लोकांची अडवणूक करीत असल्याच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी येत आहेत. त्याची गंभीर दखल घेत बावनकुळे यांनी राज्यातील सर्वच विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना पत्र पाठवून शैक्षणिक दाखले, शपथपत्रासाठी मुद्रांक पेपरची गरज नसतानाही लोकांची अडवणूक होत असेल तर संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

नागरिकांच्या हितासाठी दोन महिन्यांपूर्वी जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र तसेच न्यायालयासमोर दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी मुद्रांक पेपर रद्द करण्यात आले आहेत. हा निर्णय सामान्य व्यक्तीच्या हिताचा आहे. २००४ पासून ही सवलत लागू आहे. वारंवार सरकारच्या वतीने याबाबत सांगण्यात येते. तरीही जिल्हा व तालुका प्रशासन याकडे दुर्लक्ष करणार असेल तर कारवाई केली जाईल. सर्वसामान्य जनतेला अकारण वेठीस धरणाऱ्यांना माफी मिळणार नसल्याचे विधान नुकतेच महसूलमंत्री नाम. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे.

# एकाच दिवशी दोन आत्महत्या व एक आकस्मिक मृत्यू

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात एकाच दिवशी दोन आत्महत्या व एक आकस्मिक मृत्यू झाल्याची घटना दि. ०९ जून २०२५ रोजी उघडकीस आली. यात ब्रम्हपुरी शहरातील शेषनगर येथील रहिवासी महिला संध्या सुभाष शिवणकर वय ४० हिने आपल्या राहत्या घरी सकाळच्या १०.३० वाजताच्या सुमारास नालयन दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. तर दुसऱ्या घटनेत तालुक्यातील धानोली पोहा (चक) येथील लवकुश मंगरू बनकर वय ३७ याने दारूच्या नशेत स्वत:च्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली.

तिसरी घटना ब्रम्हपुरी शहरातील गीत पेट्रोल पंप जवळ घडली. गीत पेट्रोल पंप समोरील घर बांधकाम निर्माणधीन आहे. तिथे मजूर म्हणून सुनिल हरिशचंद्र राखडे वय २२ राह. खंडाळा हा कार्यरत होता. काम करीत असतांना, सुनिल राखडे याचे हातातील सळाखीचा जिवंत विद्युत तारेला स्पर्श झाल्यामुळे, विजेचा धक्का लागून सुनिल राखडे याचा जागीच मृत्यू झाला. ब्रम्हपुरी पोलिसांनी तिन्ही घटनेचा मर्ग दाखल केला असून भारतीय न्याय संहिता कलम १९४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# मधुकरराव जंगम यांच्या उपस्थितीत ब्रम्हपुरीत आढावा सभा

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व अधिकारी संघटनेचे राज्याध्यक्ष मधुकरराव जंगम हे विदर्भ दौऱ्यावर आले असता त्यांचा जि.प. प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था ब्रम्हपुरी सभागृहात सत्कार समारंभ व पदाधिकारी सभेला उपस्थित राहून जिल्ह्याच्या कार्याचा आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणाची माहिती घेतली. राज्यस्तरीय समस्या सोडविण्यासाठी संघटना कटींबद्ध असून समस्या १०० टक्के सोडविण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

त्यामध्ये अंशराशीकरण परतावा कालावधी ११वर्षे ३ महिने व्हावी यासाठी कोर्टात केस दाखल करण्यात आली आहे. केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी पदोन्नती एक वेतनवाढ, रजारोखीकरण, संगणक वसुलीची रक्कम परत करणे व इतर समस्या बाबत एकूण १४ केसेस क्रमांक्रमाणे १५ जून पर्यंत दाखल करण्यात येत असल्याची माहिती दिली. तसेच पेन्शन ५ तारखेच्या आत झाली पाहिजे यासाठी सर्व मु.का.अ. यांना लेखी पत्र संघटनेतर्फे देण्यात आले आहे. यापुढे कोणत्याही जिल्ह्यातील मु.का.अ. कडून पाच तारखेच्या आत पेन्शन न झाल्यास लोकांयुक्त कार्यालयात तक्रार करणार असल्याचे सांगितले.

सभेला अध्यक्ष म्हणून सुरेश अनमूलवार, प्रमुख मार्गदर्शक मधुकरराव जंगम राज्याध्यक्ष, गडचिरोली जिल्हाध्यक्ष श्री. मडावी, सरचिटणीस श्री. म्हस्के, तालुका अध्यक्ष श्री. कोट्टवार, चंद्रपूर जिल्ह्यातील विजय भोगेकर राज्यनेते, बकाने सर सरचिटणीस, जिल्हा उपाध्यक्ष कांबळे सर, सुरेश म्हस्के सर, पुष्पांकर बांगरे सर जिल्हा उपाध्यक्ष, तालुका अध्यक्ष मुरकुटे सर चिमूर, तालुका अध्यक्ष - वरोरा, तालुका अध्यक्ष- भद्रावती, तालुका अध्यक्ष,- सावली, तालुका अध्यक्ष- चंद्रपूर, ब्रम्हपुरी तालुका कार्यकारिणी अध्यक्ष,उपाध्यक्ष, सरचिटणीस, कार्याध्यक्ष, सदस्य तसेच महिला प्रतिनिधी नंदेश्वर, नारिंद्रा जनबंधु, माधुरी काळे चिमूर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन सेलोटे सरांनी व आभार प्रदर्शन टेम्भूर्णे सरांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुष्पांकर बांगरे, प्रभाकर नागरीकर, गणेश दांडेकर, रामेश्वर सेलोटे, सिद्धार्थ टेंभुर्णे, संजय पिसे, रामेश्वर मेश्राम तथा पतसंस्था ब्रम्हपुरी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# वृक्षारोपण करून पर्यावरण दिन साजरा



जागतिक पर्यावरण दिनाचे व मित्राच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन वृक्षारोपण करण्यात आले.

वृक्षारोपणात विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. ज्यामुळे वातावरणातील

ब्रम्हपुरी/का.प्र.

मागील २५ वर्षाअगोदर सन १९९९-२००० च्या वर्ग १० वी च्या बॅचने आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी एक व्हाट्सअप ग्रुप तयार करुन मागील काही दिवसाअगोदरच स्नेहमिलन सोहळा पार पाडला. आपल्या बॅच कडुन भविष्यात मानवी मुल्य जोपासुन एक सामाजिक व सार्वजनिक जबाबदाऱ्या पार पाडायच्या याचा निश्चय केल्या गेला. अशातच दूषितीकरणास हातभार लागेल व आपले मानवी मुल्य तथा मानवी आरोग्य जोपासल्या जाईल. हे वृक्षारोपण धम्मभूमी परिसर ब्रम्हपुरी येथे डॉ. प्रेमलाल मेश्राम यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. वृक्षारोपण करतांना लिलाधर वंजारी, स्मिता मेश्राम, वैशाली ठवरे, सुरेखा बागडे, अमोल बागडे, क्रिष्णा वैदय, धनपाल शेंडे, अजय खोब्रागडे, सुशील अंबादे, राकेश कुरझेकर व कुटुंबीय उपस्थित होते.

# मृदा परिक्षण सेवा कार्यक्रमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

ब्रम्हपुरी/का.प्र.

सलाम किसान, मुंबई आणि राम कृषी केंद्र, चिंचोली यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ व २ जून २०२५ रोजी मृदा परीक्षण सेवा यशस्वीपणे संपन्न झाली. या उपक्रमात परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला, ज्यामुळे शेतीसाठी आवश्यक त्या पोषणतत्त्वांची अचूक माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली. या सेवेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीतील पोषणतत्त्वांची माहिती मिळून शाश्वत आणि परिणामकारक शेती नियोजन करता येणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत शेतातून मातीचे नमुने संकलित करून त्यांचे वैज्ञानिक विश्लेषण - करण्यात आले. वापरात आलेली मृदा परीक्षण किट प्रमाणित असून, ती शेतकऱ्यांना पीकनिहाय मार्गदर्शनासह अचूक निकाल प्रदान करते. सलाम किसानचे विदर्भ विभाग विपणन व्यवस्थापक, सुमित मुंगले यांच्या मार्गदर्शनात आणि ड्रोन पायलट मुकेश नागदेवते आणि राम कृषी केंद्राचे मालक राम राऊत यांनी शेतकऱ्यांना एकत्र आणून मृदा परीक्षणाच्या महत्त्वाविषयी माहिती दिली. त्यांच्या प्रयत्नांमुळे परिसरातील शेतकऱ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

### ... QUOTES ...

"I have realized that the past and future are real illusions, that they exist in the present, which is what there is and all there is."

- Alan Watts

### चारोळी

कामचूकार चतुर माणसं
बहिरेपणाचं सोंग घेतात...
ज्यांना कमी दिसतं ते,
नको ते डोळे फाडून बघतात...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

Nevjabai Bhaiya Hitkarini Education Society's

**LMB Public School, Bramhapuri**

Tah. Bramhapuri, Dist. Chandrapur

Affi.No. 1130674 Govt. Recognized No. 3068.2014
Udise No. : 27131111830 Mob.No. 7083840564

**WE'RE HIRING**
[JOIN OUR TEAM]


Applications are invited for the following posts at LMB Public School (Self-finance, CBSE School) Bramhapuri till 16th June 2025, 12 noon in school office. Applications won't be accepted after this date.

| Sr.No. | Name of post | Requirement | Qualification |
|---|---|---|---|
| 1. | Trained Graduate Teacher (TGT) | Social Studies (SST) | Graduation + B.Ed. |
| 2. | Sport Teacher | PTI | B.P.Ed./M.P.Ed. |

Experienced persons will be preferred. The Candidate must submit all relevant certificates & Mark sheets along with recent passport size photograph. Candidates can also submit their resume on Email ID : lmbpublicschool@gmail.com

President — Mr. A.K. Bhaiya
Director — Mrs. Ashita G. Bhaiya
Principal — Mr. K.W. Qureshi

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
(पान क्र. ९ वरून)
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.

# पालकमंत्री नाम. उइके यांचे हस्ते जिल्हयातील रुग्णवाहिकांचे लोकार्पण



नागभीड/प्रतिनिधी

दि. ०९ जुन २०२५ रोजी चंद्रपूर येथे आयोजित जिल्हा नियोजन समिती बैठकी पुर्वी मा.ना.श्री अशोकजी उईके आदिवासी विकास व पालकमंत्री चंद्रपूर जिल्हा यांच्या हस्ते आमदार किर्तीकुमार उर्फ बंटीभाऊ भांगडीया यांचे प्रमुख उपस्थितीत ग्रामीण रुग्णालय नागभीड सह चंद्रपूर जिल्ह्यातील अन्य रुग्णालयाच्या रुग्णवाहिकांचे लोकार्पण पार पडले.

यावेळी खासदार डॉ. नामदेव किरसान, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार देवराव भोंगळे, आमदार किशोर जोरगेवार, आमदार अभिजित वंजारी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# लाडक्या बहिणींच्या खात्यात १,५०० जमा




ब्रम्हपुरी/का.प्र.

जून महिना सुरू होऊनही 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या ११ व्या हप्त्याचा सन्माननिधी पात्र महिलांच्या बँक खात्यात जमा झालेला नव्हता. त्यामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु, वटसावित्री पौर्णिमेच्या आधीच सन्माननिधी जमा झाल्याचे एसएमएस महिलांच्या मोबाइलवर येऊ लागताच त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत आहे.

तालुक्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे हजारो लाभार्थी आहेत. सरकारवर या योजनेमुळे मोठा आर्थिक बोजा पडला असल्याने ही योजना सरकार बंद करू शकते किंवा निधी मिळण्यास बिलंब होऊ शकते, अशा चर्चा केल्या जातात. त्यामुळे निधी जमा होण्यास थोडाही विलंब झाला, तरी महिला मंडळी एकमेकांना सन्मान निधीबाबत विचारणा सुरू करतात. एप्रिलपर्यंतचे १० हप्ते वितरीत करण्यात आले.

## २,१०० चे आश्वासन कधी पूर्ण करणार ?

मे महिन्याच्या ११ हप्त्यांची रक्कम ५ जूनपासून जमा होण्यास सुरुवात झाली आहे. २०२४ मधील विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत आयोजित प्रचारसभांमध्ये विद्यमान राज्यकर्त्यांनी 'लाडकी बहीण' योजनेच्या सन्माननिधीमध्ये वाढ करून महिलांना प्रत्येकी २,१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु त्याची अद्याप पूर्तता झाली नसून, आश्वासन कधी पूर्ण करणार, असा सवाल महिलांमधून उपस्थित केला जात आहे. महिलाम काही महिला मात्र मिळणाऱ्या निधीवर समाधानी आहेत.

## बँकांमध्ये मंगळवारी गर्दी :

५ ते ७ जून या तारखेला निधी जमा झाला. ८ जूनला रविवार होता. त्यामुळे जमा झालेली रक्कम काढता आली नाही. मात्र, मंगळवारी सदर रक्कम काढण्यासाठी अनेक महिलांनी स्थानिक पोस्ट कार्यालय, बँकांमध्ये महिलांनी गर्दी केली असल्याचे दिसून आले.

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

पाणी अडवा, पाणी जिरवा...

बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404